**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, MAR-APR, 2019, VOL- 6/50*

# अप्रगत विदयार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रम "अविष्कार गुणवर्धन कार्यक्रम"

**श्री. शेख शाहिद हजरतअली & प्राचार्या. श्रीम. राधिका इनामदार, Ph. D.**

*[1]विदयार्थी संशोधक*

*[2]मार्गदर्शक, टिळक कॉलेज ऑफ़ एज्युकेशन पुणे*

**Abstract**

*अप्रगत विदयार्थ्यांना पुरेसे मार्गदर्शन केले असता त्यांच्या गुणवत्तेत व निकालात वाढ होऊ शकते. एस.एस.सी. पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये अप्रगत विदयार्थ्यांच्या निकालात वाढ व्हावी याकरिता पुणे जिल्हा शिक्षण मंडळ या संस्थेने आपल्या पुणे जिल्ह्यातील ५३ मराठी माध्यमांच्या शाळांतील एस.एस.सी. परीक्षेचा निकाल वाढावा याकरिता एक "अविष्कार गुणवर्धन" हा उपक्रम पथदर्शी प्रकल्प म्हणून सुरू केला व या उपक्रमास मोठे यश प्राप्त झाले आहे.*

***महत्त्वाचे शब्द :*** *अप्रगत विदयार्थी, अविष्कार गुणवर्धन, एस.एस.सी. परीक्षा निकाल*

*Scholarly Research Journal is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

पौगंडावस्था हा विदयार्थ्यांच्या जीवनातील अतिशय महत्वाचा टप्पा आहे. किशोरवय हा संक्रमणाचा कालखंड साधारणपणे पौगंडावस्थेच्या थोडा आधी सुरू होतो व माणसाचे पूर्ण विकसित प्रौढ व्यक्तीत रूपांतर झाल्यावर संपतो. या अवस्थेत माणसाच्या शारीरिक व लैंगिक विकासाबरोबरच मानसिक, बौद्धिक व सामाजिक असा सर्वसमावेशक विकास होतो. या वयात विदयार्थ्यांना सामाजिक व भावनिक मदतीची गरज असते. सधारणत: इयत्ता ९ वी व इयत्ता १० वीतील विदयार्थी या गटात येतात. इयत्ता ८ वी मधून ९ वी त आलेले सर्वच विदयार्थी प्रगत नसतात, त्यांचे मानसिक व शारीरिक वयामध्ये अंतर असते. (जेन्सन, १९८०) यांच्या मतानुसार "ज्या विदयार्थ्यांच्या शारीरिक क्षमतांपेक्षा मानसिक क्षमतां कमी असतात असे विदयार्थी अप्रगत विदयार्थी गणले जातात." राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मध्ये अशा विदयार्थ्यांवर शाळा व संस्थांनी विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त केली आहे कारण वर्गात असे अप्रगत विदयार्थी स्वत:चे समायोजन व्यवस्थित करू शकत नाही. योग्य वेळी त्यांना भावनिक व सामाजिक साहाय्य प्राप्त न झाल्यास शाळेच्या व समाजाच्या अनुशासन व शिस्तीचा किंबहुना कायदा व

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अप्रगत विदयार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व उपाययोजना करून त्यांना इतर विदयार्थ्यांबरोबर प्रगतीची समान संधी देणे आवश्यक आहे.

"पुणे जिल्हा शिक्षण मंड ळ" या संस्थेची स्थापना ७ सप्टेंबर १९४१ रोजी झाली. संस्थेचे "बहुजन हिताय। बहुजन सुखाय ॥" हे ब्रीदवाक्य असून याला अनुसरून संस्थेची वाटचाल ७६ वर्षे सुरू आहे. तळागाळातील विदयार्थ्यांपर्यंत शिक्षणाचा प्रसार व्हावा हे संस्थेच्या अनेक ध्येयांपैकी एक ध्येय आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळ प्रयोगशील संस्था आहे. संस्थेच्या पुणे जिल्ह्यात मराठी माध्यमाच्या ५ ३ माध्यमिक शाळा आहेत. या शाळा बहुतेककरून पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कार्यरत आहेत. प्रतिवर्षी संस्थेच्या सर्व शाळातील साधारणत: ८००० विदयार्थी एस.एस.सी. परीक्षेक रीता प्रविष्ठ होतात. एस.एस.सी. परीक्षा मार्च २०१२ मधील संस्थेचा निकाल शेकडा ९० पेक्षा कमी होता. म्हणजेच शेकडा १० विदयार्थी अनुत्तीर्ण होऊन शैक्षणिक प्रक्रियेतून बाहेर पडत होते. अनुत्तीर्ण विदयार्थी संख्या मोठी असल्याने संस्था पदाधिकारी व मुख्याध्यापक यांनी कारणांचा शोध घेतला व सत्य परिस्थिती समोर आली. १० टक्के म्हणजे ८३८ विदयार्थी अनुत्तीर्ण झाले होते . अधिक मागे जाता असे लक्षात येते की हे विदयार्थी इयत्ता ९ वी पासून अप्रगत राहिले आहेत. असे अनुत्तीर्ण विदयार्थी शैक्षणिक प्रक्रीयेतून बाहेर पडू नयेत तसेच इयत्ता १० वी च्या उत्तीर्णतेचे प्रमाण वाढावे या उद्देशाने संस्थेने सर्व शाखांक रीता **"अविष्कार गुणवर्धन कार्यक्रम "** सुरू केला.

**समस्येचे विधान –**

अप्रगत विदयार्थ्यांकरिता पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने राबविलेल्या अविष्कार गुणवर्धन कार्यक्रमाची उपयुक्तता पाहणे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१) अप्रगत विदयार्थ्यांच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे.

२) पुणे जिल्हा शिक्षण मंडळ या संस्थेने अप्रगत विदयार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या "अविष्कार गुणवर्धन" कार्यक्रमाची उपयुक्तता पहाणे.

**संशोधन समस्येची पार्श्वभूमी-**

If I cannot learn the way you teach, will you teach me the way I can learn?"

(L. D. Child).

६ ते १४ वयोगटातील विदयार्थ्यांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा एप्रिल २०१० पासून देशात लागू झाला व या कायदयानुसार बालकांना उच्च, दर्जेदार प्राथमिक शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार मिळाला. शाळेत आलेल्या बालकांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी शिक्षकांवर आहे, तसेच वर्षाअखेरीस वर्गातील सर्व बालकांना सर्व विषयांतील किमान संपादणूक पातळीपर्यंत पोहचविणेची जबाबदारी कायदयाने सुनिश्चित केली आहे. शासनाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम नियोजित वेळेत पूर्ण करून सर्व बालकांना अपेक्षित कौशल्य प्राप्त करून देण्याची जबाबदारी व कर्तव्य शिक्षकांचे आहे. शासनाने निर्धारित केलेली बालकांच्या विकासाची उद्दिष्टये ही राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा व राज्य अभ्यासक्रम आराखडा यांच्याशी संबंधित आहे व ती प्राप्त करण्यासाठी बालकांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन काटेकोरपणे होणे अपेक्षित आहे. बालकांना अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणण्यासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन काटेकोरपणे होणे फार गरजेचे आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनासाठी आवश्यक साधने व तंत्रे शिक्षकांना माहित आहे व त्यासंदर्भात शासन, संस्था शाळास्तरावर वारंवार शिक्षकांचे प्रशिक्षण व उदबोधन करण्यात आले आहे . "असर" या संस्थेच्या सन २०१६ च्या अहवालानुसार राष्ट्रीय पातळीवरील इयत्ता ८ वी मधील विदयार्थ्यांच्या इयत्ता २ री च्या प्रथम भाषा वाचन क्षमतेचे प्रमाण ७३ % एवढे तर महाराष्ट्रात सरकारी शाळा ७७% व खाजगी शाळांचे प्रमाण ८० % एवढे आहे. तीन अंकी संख्येला १ अंकी संख्येने भाग देणे ही क्रिया करण्याच्या क्षमतेचे इयत्ता ८ वी मधील प्रमाण राष्ट्रीय पातळीवर ४३% तर महाराष्ट्रात सरकारी शाळात ३१ % तर खाजगी शाळांचे प्रमाण ३३% एवढे आहे. वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की अप्रगत विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रचंड आहे. शासकीय व खाजगी पातळीवर या समस्येवर अनेक चर्चासत्रे, विचारमंथन व संशोधन झाले आहे, परंतु योग्य अंमलबजावणी अभावी योग्य परिणाम साध्य झालेले नाहीत.

**अप्रगत विदयार्थी सामाजिक व शैक्षणिक स्थिती :**

अप्रगत वि दयार्थी असे वि दयार्थी आहेत जे सामान्य वि दयार्थ्यांशी तुलना करता कमीतकमी शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यास फारच अक्षम आहेत. त्यांची अपेक्षा उत्तीर्ण श्रेणी मि ळावी एवढीच असते. त्यांच्याकडून कमीतकमी बुद्धिमत्तेची अपेक्षा असते. अशा विदयार्थ्यांना मुख्य प्रवाहात शिक्षण मिळत नाही. या वर्गातील मुलांसाठी विशेष शाळांची स्थापना करणे व्यावहारिक नाही. आपण अप्रगत व अध्ययन अक्षम विदयार्थ्यांमध्ये फ़रक केला पाहिजे. या अप्रगत वि दयार्थ्यांना अध्ययन अक्षम विदयार्थ्यांसारखे विशेष

शिक्षण मिळू शकत नाही कारण त्यांच्या बौद्धिक पातळीला मानसिकदृष्ट्या मंदबुद्धी म्हणून वर्गीकृत करता येत नाही. जर आपण या अप्रगत विदयार्थ्यांकडे दुर्लक्ष केले असता ते त्यांच्या अभ्यासात नावड निर्माण होण्याची शक्यता असते व ते शालाबाह्य होऊ शकतात. तसेच त्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन व साहाय्य न मिळाल्यास असे विदयार्थी पूर्णपणे निराश होण्याची शक्यता आहे आणि त्यातून अनैतिक मार्ग व व्यापाराकडे प्रवृत्त होऊन शकतात. अप्रगत विदयार्थ्यांच्या कारणांचा शोध घेतला असता काही महत्त्वाची कारणे खालील प्रमाणे आढळून येतात.

- वैयक्तिक कारणे-
  - अल्प आत्मसंतुष्टता
  - समस्या सोडवण्याची कौशल्ये नसणे
  - अल्प स्मरणशक्ती क्षमता
  - साधनांचा अभाव
  - भावनिक अस्वस्थता
- **सामाजिक /कौटुंबिक कारणे-**
  - पालकांमध्ये शिक्षणाविषयी अनास्था-
  - पालक अल्पशिक्षित व अल्प उत्पन्न गटातील-
  - कार्य बाहुल्यामुळे पाल्यांसाठी पुरेसा वेळ न देणारे पालक –

अशा विदयार्थ्यांमध्ये अपेक्षित यश आणि प्रत्यक्ष कामगिरी दरम्यान विसंगती आढळून येते. शाळेत जाताना मुलांना शालेय विषय आणि शालेय कामकाज यांमध्ये अडचणी येत आहेत. अशा प्रकारे स्वत: विनियमित शिक्षण (बओफार्ड, बोईसवर्ट आणि वीझेऊ, २००३) यांच्यातील सक्रिय बांधिलकी आणि प्रयत्नांना टिकवून ठेवण्यासाठी मुलांच्या कामगिरीवर त्यांची प्रेरणा अवलंबून असते. (नायर एट अल, २००३), यांच्या संशोधनानुसार साधारणत: शाळेतील ५ ते १५ टक्के विदयार्थ्यांमध्ये शैक्षणिक मागासलेपणा आढळून येतो, शैक्षणिक अपयशाचा धोका असलेल्या विदयार्थ्यांची वेळेवर दखल घेणे ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे.

**अविष्कार गुणवर्धन कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये–**

- अनुत्तीर्ण होणाऱ्या विदयार्थ्यांचे प्रमाण कमी करून निकालाच्या टक्केवारीत वाढ करणे.
- अनुत्तीर्ण विदयार्थी शिक्षण प्रक्रीयेतून बाहेर पडू नयेत यासाठी उपाययोजना करणे.
- अप्रगत विदयार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविणे.

- अप्रगत विदयार्थ्यांकरीता शैक्षणिक समानतेची संधी उपलब्ध करून देणे.

**कार्यपद्धती-**

**१) संस्था पातळीवरील कार्यवाही-**

अ) विदयार्थी निवड – इयत्ता ९ वी मध्ये वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण विदयार्थ्यांपैकी विषयनिहाय शेकडा ३५ ते ४४ गुण प्राप्त करणारे विदयार्थी संस्थेच्या सर्व माध्यमिक शाळातून निवडण्यात आले.

कोष्टक क्रमांक १ - सन २०१२-१३ मध्ये इयत्ता ९ वी मधून उत्तीर्ण होऊन सन २०१३-१४ मध्ये इयत्ता १० वी मध्ये आलेले प्रगत व अप्रगत विदयार्थ्यांचे शेकडा विषय निहाय प्रमाण

| अ.क्र. | तपशील | विषय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी | गणित | विज्ञान | स.शास्त्र |
| १ | अप्रगत विदयार्थी ( शे. ३५ ते शे. ४४ गुण) | २०६५ | २०३६ | २७२७ | ३२५८ | ३४१० | २१६७ |
| | | २४.५८ | २४.२४ | ३२.४६ | ३८.७९ | ४०.६० | २५.८० |
| २ | प्रगत विदयार्थी ( शे. ४५ च्या पुढे गुण ) | ६३३५ | ६३६४ | ५६७३ | ५१४२ | ४९९० | ६२३३ |
| | | ७५.४२ | ७५.७६ | ६७.५४ | ६१.२१ | ५९.४० | ७४.२० |
| | एकूण विदयार्थी | ८४०० | ८४०० | ८४०० | ८४०० | ८४०० | ८४०० |

ब) विदयार्थ्यांचे वर्गीकरण- विषयानुसार विदयार्थ्यांचे प्रगत व अप्रगत गट तयार करणे.

क) अप्रगत विदयार्थ्यांचे विषय निहाय गट करणे .

ड) संस्थेतील अनुभवी तज्ज्ञ अध्यापकांचे विषय निहाय पॅनेल तयार करणे.

इ) तज्ञ अध्यापक समिती द्वारे प्रत्येक विषयाचे आवश्यक किमान संबोध तयार करून घेणे.

फ़) प्रश्नपत्रिका निर्मिती-."सोप्या कडून अवघडाकडे" या अध्ययन तत्वानुसार अशा विद्यार्थ्यांना अधिक सरावातून आत्मविश्वास निर्माण व्हावा व "मला हे येते" ही भावना निर्माण होण्यासाठी एस.एस.सी. बोर्डाच्या मागील परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करून उत्तीर्ण होण्यासाठी अप्रगत विदयार्थ्यांना कोणत्या घटकांचा सराव देणे आवश्यक आहे त्यानुसार प्रत्येक विषयाच्या १ ते ३ गुणांचे प्रश्न असणाऱ्या ५ चाचणी प्रश्नपत्रिका वार्षिक अभ्यासक्रम नियोजना नुसार तयार करून घेणे.

ग) सराव चाचण्यांचे वेळापत्रक तयार करणे.

ज) प्रश्नपत्रिका शाखेतील अप्रगत विदयार्थी संख्येएवढ्या तयार करून शाखांना वितरीत करणे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२) शाखा पातळीवरील कार्यवाही-

अ) अप्रगत विदयार्थ्यांची  वैयक्तिक माहिती संकलन करणे.

ब) अप्रगत विदयार्थ्यांच्या पालकांची सभा घेऊन कार्यक्रमाचे स्वरूप समजावून सहकार्य करण्याचे आवाहन करणे.

क) विदयार्थ्यांच्या मनात न्युनता किंवा वेगळेपणाची भावना निर्माण होऊ नये या करीता शाळेच्या वेळेतच व इतर सामान्य विदयार्थ्यांबरोबर अशा विदयार्थ्यांसाठी चाचणी वेळापत्रक तयार करणे.

ड) मूल्यांकन व सराव चाचण्यांच्या नोंदींचे रजिस्टर तयार करणे.

इ) विषयनिहाय चाचण्यांचे अध्यापकांकडून मूल्यमापन करून रजिस्टर मध्ये नोंदी करणे . उत्तरलेखनातील त्रुटी दूर करण्यासाठी गटाला मार्गदर्शन करणे . अधिक गुण मिळवून गुणांची स्पर्धा करणे हा उद्देश नसून अधिक सरावातून विषय ज्ञान अधिक प्रगल्भ करणे ही भूमिका विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.

फ़) पालक शिक्षक- दत्तक विद्यार्थी  गट तयार करणे.  अप्रगत विदयार्थ्यांकडून अध्यापकांनी अव्यवहार्य अपेक्षा न ठेवता त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक हवा. अशा विदयार्थ्यांप्रती कोणतेही पूर्वग्रह न ठेवता त्यांना सर्वोत्परी साहाय्य करून अध्ययनासाठी गतिमान करणे ही भूमिक बजावण्याच्या हेतूने अध्यापकांचे  गट करून विदयार्थ्यांच्या गटाचे पालकत्व देणे .

अविष्कार गुणनोंद तक्ता -

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळ**
**शाखेचे नाव ----**
**अविष्कार गुणवर्धन रजिस्टर सन २०   - २०**
**विद्यार्थ्याचे नाव** **परीक्षा क्रमांक**

| विषय | इयत्ता ९ वी प्राप्त गुण | अविष्कार १ | अविष्कार २ | अविष्कार ३ | घटक चाचणी | अविष्कार ४ | अविष्कार ५ | सत्र १ | अविष्कार ६ | अविष्कार ७ | अविष्कार ८ | सराव १ | सराव २ | एस.एस.सी. परीक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | | | | | | | | | | | | | | |
| हिंदी | | | | | | | | | | | | | | |
| इंग्रजी | | | | | | | | | | | | | | |
| गणित १ | | | | | | | | | | | | | | |
| गणित २ | | | | | | | | | | | | | | |

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विज्ञान | | | | | | | | | | | | | | | |
| इति.राज्य. | | | | | | | | | | | | | | | |
| भूगो-अर्थ | | | | | | | | | | | | | | | |

ज) सनियंत्रण – शाळा व्यवस्थापन, शाळासमिती व संस्थेमार्फ़त कार्यक्रमाचा व विदयार्थी प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे.

कोणत्याही उपक्रमाचे यश हे त्या उपक्रमाचे ध्येये-उद्दिष्ट्ये , उपलब्ध साधनसामग्री , योग्य नियोजन, कार्यवाही, अनुधावन, आवश्यक बदल, नियंत्रण व उपक्रमाचे सातत्यपूर्ण मूल्यमापन या बाबींवर अवलंबून असते. ( डॉ. सुब्रमनियन-NCERT )

कोष्टक क्रमांक २- मार्च २०१३ ते मार्च २०१६ एस.एस.सी. परीक्षा तुलनात्मक निकाल

| अ.क्र. | तपशील | मार्च २०१३ | प्रविष्ठ | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | मार्च २०१४ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शे. निकाल | | | | शे. निकाल |
| १ | महाराष्ट्र राज्य | 83.48 | 1549784 | 1368796 | 180988 | 88.32 |
| २ | पुणे विभाग | 88.25 | 254553 | 235090 | 19463 | 92.35 |
| ३ | पुणे जिल्हा | 93.08 | 126322 | 118053 | 8269 | 93.45 |
| ४ | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ | 93.37 | 8262 | 7772 | 490 | 94.07 |

| अ.क्र. | तपशील | मार्च २०१४ | प्रविष्ठ | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | मार्च २०१५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शे. निकाल | | | | शे. निकाल |
| १ | महाराष्ट्र राज्य | 88.32 | 1572268 | 1437922 | 134346 | 91.46 |
| २ | पुणे विभाग | 92.35 | 254058 | 241617 | 12441 | 95.10 |
| ३ | पुणे जिल्हा | 93.45 | 123040 | 118596 | 4444 | 96.39 |
| ४ | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ | 94.07 | 8153 | 7858 | 295 | 96.38 |


| अ.क्र. | तपशील | मार्च २०१५ | प्रविष्ठ | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | मार्च २०१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शे. निकाल | | | | शे. निकाल |
| १ | महाराष्ट्र राज्य | 91.46 | 1601406 | 1434143 | 167263 | 89.56 |
| २ | पुणे विभाग | 95.10 | 260142 | 242714 | 17428 | 93.30 |
| ३ | पुणे जिल्हा | 96.39 | 125103 | 118091 | 7012 | 94.40 |

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ | 96.38 | 8115 | 7836 | 279 | 96.56 |

(संदर्भ - राज्य मंडळ वेबसाईट व संबंधित वर्षांचे)

संस्था अहवाल आलेख क्रमांक १- एस.एस.सी. परीक्षा मार्च २०१३ ते मार्च २०१६ निकाल




**निरीक्षण व अर्थनिर्वचन -**

१. एस.एस.सी. परीक्षा मार्च २०१२ मध्ये १०% ( ८३८ विदयार्थी ) विदयार्थी अनुत्तीर्ण होते.

२. एस.एस.सी. परीक्षा मार्च २०१६ मध्ये ३.५% (२७९ विदयार्थी )विदयार्थी अनुत्तीर्ण झाले.

३. मार्च २०१६ मध्ये २४ शाखांचा निकाल १००% व २४ शाखांचा निकाल ९५ ते ९९ % या दरम्यान होता.

मार्च २०१२ मधील अनुत्तीर्ण विदयार्थ्यांच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. अप्रगत विदयार्थ्यांच्या अनुत्तीर्णतेमुळे शाखांचे निकाल १००% नव्हते या उपक्रमामुळे मार्च २०१६ एस.एस.सी. परीक्षेत संस्थेच्या २४ शाखांचे निकाल १००% असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष -**

१.संस्थेच्या श्रेणीनिहाय व एकूण निकालात वाढ झाल्याचे आढळून आले.

२.शैक्षणिक प्रक्रीयेबाहेर जाणारे विदयार्थी शिक्षण प्रवाहात आणण्यात यश प्राप्त झाले.

३.विदयार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ करण्यात यश आले.

४.आनंददायी शिक्षण प्रक्रिया राबविण्याचे समाधान मिळाले.

५.गळतीचे प्रमाण कमी करण्यात यश मिळाले.

६.पालकांमध्ये समाधान निर्माण झाले.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**चर्चा व पुढील संशोधनाकरिता विषय-**

अनेक संस्था आपल्या विदयालयाचा एस.एस.सी. परीक्षेचा निकाल १००% असावा याकरिता प्रयत्नशील असतात. अधिकाधिक विदयार्थी एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता नाविण्यपूर्ण उपक्रम राबवित असतात. अशा उपक्रमांमध्ये पर्यवेक्षित अभ्यास, दीर्घ सुट्टीमधील जादा तास, प्रश्नपत्रिकांचा सराव, वारंवार उजळणी, सराव परीक्षा इ. सकारात्मक मार्गांचा अवलंब करताना आढळतात तर काही शाळा विदयार्थ्यांना इयत्ता ९ वीत अनुत्तीर्ण करणे, परीक्षे दरम्यान गैरमार्गांचा वापर करणे यासारख्या गैर व अनुचित मार्गांचा वापर करताना दिसतात. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने सकारात्मक दृष्टीकोनातून संस्थेतील अध्यापकांबरोबर चर्चा करून एक नाविण्यपूर्ण उपक्रम राबविला. शिक्षकांना अध्यापनात येणाऱ्या अडचणी व अप्रगत विदयार्थ्यांची शैक्षणिक व सामाजिक कारणे विचारात घेऊन अविष्कार गुणवर्धन कार्यक्रमाचे संचलन करण्यात आले व हा उपक्रम यशस्वी झालयाचे आढळून आले.

अप्रगत विदयार्थी शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थांमध्ये शोधून या विदयार्थ्यांकरिता नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जाऊ शकतात. अशा उपक्रमाची रूपरेषा ठरवून कार्यक्रमाची अंमलबजावणी करता येऊ शकते.

**संदर्भ –**

*Around slow learners: an experimental study. Ncert sponsored research. Project report submitted. By. Dr. S. Subramanian.*

*Slow Learners - by RR Borah , Page 1. International Journal of Educational Planning & Administration. ISSN 2249-3093 Volume 3, Number 2 (2013), pp. 139-143. Research India Publications*

*Role_of_teachers_on_helping_slow_learners:www.academia.edu, Volume: 3 | Issue : 3 | March 2014 ISSN No 2277 - 8179 Research Paper Education*

*30 Methods to Improve Learning Capability in Slow Learners :*
*K. Dasaradhi Research Scholar, RTM Nagpur University Nagpur ,*
*ijellh.com/wp- content/uploads/2016/03/60.Dasardhi-paper-final.pdf*

*Role of teachers on helping slow learners to bring out their hidden skills*
*Volume : 3 | Issue : 3 | March 2014 • ISSN No 2277 - 8179 Research Paper Education*

*असर अहवाल २०१५ व २०१६*

*पुणे जिल्हा शिक्षण मंडळ अहवाल, २०१२- १३ ते २०१६- १७*

*राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५*

*राज्य मंडळ वेबसाईट*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*